MHNG130011982022

दिवाणी दावा क्र. ४३/२०२२
इंदिराबाई वि. अनिल

निशाणी क्रमांक २१ खालील आदेश.
(दि. १०/०८/२०२३ रोजी पारीत)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे.

२] वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, मौजा वडेगांव, ता. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्वे क्र. १४२/१ याचे क्षेत्र ०.८० हे.आर. या शेतजमिनीची वादी ही कायदेशीर मालक व कब्जेदार आहे. वादीचे पतीने दिनांक २४/०५/२०२१ रोजी वाद मिळकत ही कचरु मंगल डोंगरे यांच्याकडुन खरेदी घेतलेली आहे. खरेदी घेतेवेळी दावा मिळकतीचे मूळ मालक कचरु मंगल डोंगरे व ताराचंद मंगल डोंगरे यांनी दावा मिळकतीमध्ये जाण्यासाठी शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या शेतजमिनीच्या धु–यावरुन रस्ता असल्याचे सांगितले होते. वादी ही शेत सर्वे नं. १४३ ही पडीक असल्याने त्या शेतजमिनीमधून तिच्या शेताची वहिवाट करीत होती. परंतू, शेत सर्वे नं. १४३ च्या मालकाने सदर जमीन वहिवाटणे सुरु केल्याने वादी ही शेत सर्वे नं. १४२/२ च्या धु–यावरुन जाऊ लागली. प्रतिवादीने शेतसर्वे नं. १४२/२ ही शेतजमीन खरेदी घेतली आहे. प्रतिवादी हे वादीस तिच्या जमिनीची वहिवाट करण्यास शेत सर्वे नं. १४२/२ या शेतजमिनीच्या धु–यावरुन हरकत अडथळा करीत असल्याने वादीने दिनांक ०४/०१/२०१८ व ११/०१/२०१८ रोजी तहसीलदार रामटेक यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. तहसीलदार यांच्या आदेशाने संबंधीत तलाठ्याने मोक्यावर येऊन शेतजमीनीचा पंचनामा केला. त्यानंतर

तहसीलदार रामटेक यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या शेतजमिनीच्या धु–यावरुन वादीला जाण्यायेण्याचा रस्ता दिलेला आहे. सदरच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल न केल्याने सदरचा आदेश कायम आहे. प्रतिवादी हे वादीला सदरचा आदेश तिच्या हक्कात देऊन देखील शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या धु–यावरुन जाण्यायेण्यास हरकत अडथळा करीत असल्याने वादीने त्यांच्याविरुद्ध तुर्तातूर्त ताकीद मागितलेली आहे.

३] प्रतिवादीने निशाणी क्र. २२ वर सदरच्या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन अर्जदार यांच्या बाजुने कोणत्याही प्रकारची प्रथमदर्शनी अनुकूलता, कल दिसून येत नाही. अर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ शकत नाही. अर्जदार हे भांडखोर वृत्तीचे असून काही कारण नसताना कास्तकार या लोकांसोबत भांडण करीत असते. प्रतिवादी क्र. १ याने शेत सर्वे नं. १४२ मधील उत्तर–दक्षिण धुरा पाडून पूर्वेकडील ०.४० आर ही शेतजमीन रघुनाथ वल्द मंगल डोंगरे यांच्याकडून दिनांक २१/०५/२०२१ रोजी खरेदी घेतली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ हे सदरच्या खरेदीखताधारे शेत सर्वे नं. १४२/२ या शेतजमिनीचे कायदेशीर मालक व कब्जेदार झालेले आहेत. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा शेतजमिनीशी कोणताही संबंध नसल्याने त्यांना दाव्यात पार्टी केल्याने दाव्याला संयोजनाचे तत्व लागू होते. वादी ही तिच्या शेतजमिनीमध्ये शिव धु–यावरुन नाल्याच्या बाजूने जाणे–येणे करीत होती. त्यामुळे वादी व तिच्या पतीने सन–२००१ पासून सन–२०१८ पर्यंत नवीन रस्त्याची मागणी केली नव्हती. सन–२०१८ साली वादीने बनावट व खोटा अर्ज तहसीलदार रामटेक यांच्याकडे सादर केला होता. वादीला जुना रस्ता अस्तित्वात असतांना सुद्धा तहसीलदार रामटेक यांनी दिनांक ११/०६/२०१८ रोजी अटी व शर्ती नमूद करुन नवीन रस्ता दिला होता. सदरचा आदेश हा कायदेसंगत नाही. त्यानंतर वादी हिने सदरच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी यांच्या

शेतजमिनीमधील पिकांचे नुकसान करुन बेकायदेशीररित्या १५ फुटाचा नवीन रस्ता बनविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे प्रतिवादीने तहसीलदार, पोलीस स्टेशन रामटेक यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. वादीने तहसीलदार रामटेक यांच्या आदेशाचा आधार घेऊन दावा दाखल केला असल्याने सदरचा दावा हा या कोर्टाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. सदरच्या दाव्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ ची बाधा येत आहे. वादीने मुदतीत दावा दाखल केलेला नाही. वादीने दिनांक ०१/०७/२०२३ रोजी प्रतिवादीच्या पिकातून ट्रॅक्टर नेऊन पिकांचे नुकसान केलेले आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४] वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने, वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोरे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी.बी. बांते यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१)	वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे का ?	...होकारार्थी.
२)	दाव्याचा कल वादीच्या बाजूने आहे का ?	...होकारार्थी.
३)	वादीच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमीत असे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल का?	...होकारार्थी.
४)	आदेश ?	..अंतिम आदेशाप्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u> :-

५] मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने मी त्यावरील चर्चेकरीता सदरचे मुद्दे एकाच वेळी विचाराधीन घेतलेले आहेत.

६] वादीने प्रस्तुतचा दावा हा मौजा वडेगांव, ता. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्वे

नं. १४२/१ या जमिनीची वहिवाट करण्यासाठी शेतसर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या जमिनीच्या धु–यावरुन जाण्यायेण्यास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये, म्हणून दाखल केलेला आहे. वादीचे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोरे यांनी निशाणी क्र. २१ वरील तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर असा युक्तीवाद केला की, मौजा वडेगांव येथील शेत सर्वे नं. १४२/१ ही शेतजमीन वादीच्या मालकीची आहे. प्रतिवादी हे मौजा वडेगांव येथील शेत सर्वे नं. १४२/२ या शेतजमिनीचे मालक आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या शेतजमिनीचा मूळ सर्वे नंबर हा १४२ असा आहे. शेत सर्वे नं. १४२/१ ला लागुन शिव आहे. वादीच्या शेतामध्ये जाण्यापूर्वी प्रतिवादीचे शेत लागते. वादीने खरेदी घेतलेल्या जमिनीमध्ये जाण्यासाठी शेत सर्वे नं. १४२ व १४३ या शेतजमिनीच्या धु–यावरुन रस्ता देण्यात आलेला आहे. शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ यामध्ये असणारी धुरा ही प्रतिवादीने काढुन लहान केली. सदरच्या शेत सर्वे नंबरमधील धुरा ही सद्यस्थितीला केवळ ३ फुट ठेवलेली आहे. वादीला सदरच्या धु–यावरुन वाद मिळकतीची वहिवाट करण्यासाठी जावे लागते. त्यामुळे वादीने शेत सर्वे नं. १४२/२ व १४३ या शेतजमिनीच्या धु–यावरुन शेत वहिवाटीसाठी रस्ता मागितला असता त्याबाबत पंचनामे झाल्यानंतर तहसीलदार रामटेक यांनी महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये आदेश पारीत करुन वादीला धु–यावरुन रस्ता दिलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार शिव धु–याच्या बाजुने नाला असून त्या नाल्यावरुन वादीला तिच्या शेताची वहिवाट करायला जाण्यास रस्ता आहे. परंतू, सदरच्या नाल्यास पावसाळ्यामध्ये पाणी असते, त्यावरुन रस्ता नाही. त्यामुळे वादीला तिच्या शेताची वहिवाट करायला नाल्याच्या कडेने जाता येत नाही. वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व १४३ या धु–याशिवाय दुसरीकडुन रस्ता असता तर प्रतिवादीने सदरच्या रस्त्याने जाण्यास वादीला संमती दिली नसती.

७] तहसीलदार यांनी प्रत्यक्षात पाहणी केल्यानंतर वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या धु–यावरुन जाण्याबाबत रस्ता दिलेला आहे. प्रतिवादी हे तहसीलदार यांनी

आदेश करुन देखील वादीला सदरच्या रस्त्याला जाण्यास हरकत अडथळा करीत आहेत. सदरच्या नाल्याच्या कडेने बैलगाडी व ट्रॅक्टर जाऊ शकत नाही. वादीला चालू वर्षीदेखील प्रतिवादीने धु–यावरुन रस्ता न दिल्याचे धानाची लागवड करता आली नाही. प्रतिवादीच्या विरुद्ध तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

८] याउलट, प्रतिवादीचे विधीज्ञ श्री. पी.बी. बांते यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने शेत सर्वे नं. १४३ चे जमीन मालकास या दाव्यात सामील केलेले नाही. वादीने सन–२००१ मध्ये शेतजमीन खरेदी केली असेल तर तेव्हापासून प्रतिवादीच्या विरुद्ध रस्त्याबाबत तक्रार केलेली नाही. दिनांक १४/०५/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीनंतर हा दावा दाखल केलेला आहे. तहसीलदार यांनी सन–२०१८ साली आदेश केल्यानंतर देखील सन–२०२२ पर्यंत वादीने कुठलीही तक्रार केलेली नाही. प्रतिवादी हे वादीला हरकत अडथळा करीत नाहीत. वादीने तहसीलदार यांच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन दावा दाखल केलेला आहे. तहसीलदार यांनी वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या धु–यावरुन ३ फुटाचा रस्ता दिल्यानंतर त्या ठिकाणी वादीने १५ फुटाचा रस्ता बनवण्याचा प्रयत्न केला. त्यास प्रतिवादीने हरकत घेतली होती. प्रतिवादी व शेत सर्वे नं. १४३ या धारकाची धु–यावर मालकी आहे. परंतू, वादीने सदरच्या धारकास दाव्यात पार्टी केलेली नाही. वादी हे सन–२००१ पासून सन–२०११ पर्यंत शेत सर्वे नं. १४३ या जमिनीमधून येत–जात होते. वादीने शेत सर्वे नं. १४२/२ व १४३ या धु–यावरुन नव्याने रस्ता करण्याचा प्रयत्न केला होता. म्हणून त्यास हरकत घेतली होती. तहसीलदार हे ज्यावेळी प्रत्यक्ष पाहणीसाठी आले होते त्यावेळी नाल्याच्या बाजूने १० ते १५ फुटाची पहार आहे ही बाब तहसीलदार यांच्या लक्षात आली होती. म्हणून वादीला केवळ जाण्यायेण्यासाठी ३ फुटाचा रस्ता शेत सर्वे नं. १४२/२ व १४३ या बांध्याच्या धु–यावरुन देण्यात आला होता. ट्रॅक्टरसाठी नाल्याकडुन रस्ता आहे. खरेदीखतामध्ये नमूद केलेला

रस्त्याबाबतचा मजकूर हा पेनने लिहीलेला आहे. त्याठिकाणी सही नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये या न्यायालयाला अधिकार नाही. वादीने जमीन घेण्यापूर्वी प्रतिवादी याने ४ दिवस अगोदर शेत सर्वे नं. १४२/२ या जमिनीची खरेदी घेतली होती. वादीने तहसीलदार यांच्या आदेशाचा आधार घेऊन दावा दाखल केला असल्याने या न्यायालयास अधिकार नाही. दाव्यास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ९ अन्वये या न्यायालयास दावा दाखल करुन घेण्यास बाधा येते. वादीचा अर्ज मंजूर झाल्यास त्याठिकाणी नव्याने रस्ता करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. वादीने त्याठिकाणी रस्ता केल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

९] वादी व प्रतिवादी यांची परस्परविरोधी कथने, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर मी वरील मुद्दयांवरील चर्चेकरीता वळत आहे. वादी हे मौजा वडेगांव, ता. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्वे नं. १४२/१ या जमिनीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत. प्रतिवादी हे मौजा वडेगांव, ता. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्वे नं. १४२/२ या शेतजमिनीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये जमिनीच्या मालकीबाबत व कब्जाबाबत वाद असल्याचे दिसून येत नाही. वादी हे त्यांच्या शेत जमिनीमध्ये जाण्यासाठी प्रतिवादीने सर्वे नं. १४२/२ व १४३ या जमिनीच्या धु–यावरुन जाण्यास हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातूर्त ताकीद प्रतिवादीविरुद्ध मागत आहेत. वादीला त्यांच्या जमिनीची वहिवाट करण्यासाठी सदरच्या रस्त्याशिवाय अन्य पर्यायी रस्ता नसल्याने तहसीलदार यांच्याकडे अर्ज देऊन रा.म.क्र. ५/बीएनडी–५४/२०१७–२०१८ अन्वये रस्ता मंजूर करुन घेतलेला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादी ही तिच्या शेतजमिनीमध्ये नाल्याच्या बाजूने जुन्या रस्त्याने जाणे–येणे करीत होती. त्यामुळे सन–२००१ पासून सन–२०१८ पर्यंत वादीने नवीन रस्त्याची मागणी केलेली नव्हती. वादी व प्रतिवादी यांची परस्परविरोधी कथने याचे अवलोकन केल्यानंतर मी तहसीलदार

रामटेक यांनी दिनांक ११/०६/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशामधील मजकूर या ठिकाणी नमूद करु इच्छीत आहे.

१०] ''तसेच प्रकरणात नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचे उपस्थितीत दिनांक ०८/०६/२०१८ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले. त्यानुसार मौजा वडेगाव–चोखाळा रोडवरुन उत्तर भाग मौजा चोखाळा व खंडाळा (बु.) या गावाला शिवधुरा असून जाण्यायेण्याचा रस्ता मोक्यावर उपलब्ध आहे. सर्वे नं. १४२ चे दोन भाग सर्वे क्र. १४२/१ व १४२/२ पडलेले आहेत. सर्वे नं. १४२/१ श्रीमती इंदिराबाई बाळकृष्ण पाटील यांचा असून या शेताला जाण्यायेण्याकरीता सर्वे नं. १४२ व १४३ च्या धु–यावरुन सर्वे नं. १४३ च्या जागेतून वहीवाट करीत असल्याचे दिसून आले. सद्यःस्थितीत सर्वे नं. १४२ व १४३ मधील धुरा हा अंदाजे ३ फुट आहे. श्रीमती इंदिराबाई बाळकृष्ण पाटील यांनी सर्वे नं. १४२/२ मधून रस्ता मिळावा, अशी मागणी केली असता सर्वे नं. १४२/२ चे सहमालक श्री. अनिल नामदेव डोंगरे यांनी त्यांचे शेतातून जाण्यायेण्याकरीता आपली संमती दर्शविली. परंतू, अर्जदाराने त्यांच्या वहीवाटीमुळे शेत पिकाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच शेत पिकाचे नुकसान झाल्यास त्याची लागवड करुन द्यावी, अशी अट ठेवली. उपरोक्त प्रकरणात अर्जदाराचा अर्ज, तलाठी यांचे मौका चौकशी अहवाल, प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

१) मौजा वडेगाव ते चोखाळा रोडवरुन उत्तर भाग मौजा चोखाळा व खंडाळा (बु.) या गावाला शिवधुरा असून जाण्यायेण्याचा रस्ता मौक्यावर उपलब्ध असल्याचे दिसून येते.''

२) सर्वे नं. १४२/२ चे सहमालक श्री. अनिल नामदेव डोंगरे यांनी अर्जदारास त्यांचे शेतातून जाण्यायेण्याकरीता आपली सशर्त संमती दर्शविल्याचे स्पष्ट होते.''

११] तहसीलदार यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मोक्यावरची परिस्थिती असून प्रतिवादी

कथन करतात त्याप्रमाणे वादीला शिवधु–याच्या बाजुने नाल्याच्या कडेने रस्ता उपलब्ध आहे. परंतू, वादीच्या कथनानुसार सदरच्या रस्त्याने वादीला पावसाळ्याच्या काळात जाता येत नाही. वादीला तिच्या शेतात भाताचे पीक हे पावसाळ्यातच लावावे लागते. त्यासाठी चिखल तुडविण्यास ट्रॅक्टरचा वापर केला जातो. वादीला पावसाळ्याच्या दिवसात दावा मिळकतीमध्ये नाल्याच्या कडेने शिवधु–याकडुन शेतात ट्रॅक्टर घेऊन जाता येत नाही, म्हणूनच प्रतिवादीने वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ मधील धु–याने जाण्यास संमती दिलेली आहे. त्याप्रमाणे तहसीलदार रामटेक यांनी दिनांक ११/०६/२०१८ रोजी वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ च्या संयुक्त धु–याने रस्ता दिलेला आहे. प्रतिवादीला पुन्हा सदरचा रस्ता हा केवळ ३ फुट एवढाच दिला होता, असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्यक्षात धुरा ही ३ फुटाची असल्याने त्यावरुन वादीला बैलगाडी, ट्रॅक्टर अथवा वाहीजुपी करण्यासाठी शेतात अवजारे ही ३ फुटाच्या जागेमधून नेता येणार नाही. तहसीलदार रामटेक यांनी वादीला त्याच्या शेताची वाहीजुपी करण्यासाठी रस्ता दिलेला आहे. त्यामुळे तहसीलदार यांनी वादीला दिलेला रस्ता हा ३ फुटाचा दिला होता, असे प्रतिवादीला म्हणता येणार नाही.

१२] वादीला तहसीलदार यांनी वाहीजुपीकरीता रस्ता दिल्यानंतर त्याविरुद्ध अपील दाखल करुन सदरच्या आदेशास हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचा आदेश हा वादी व प्रतिवादी यांच्यावर बंधनकारक आहे. वादीला शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ च्या संयुक्त धु–याने रस्ता दिल्यानंतर त्यास प्रतिवादी हा हरकत अडथळा करत आहे. त्यामुळे वादीच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीद देणे आवश्यक आहे. प्रतिवादीच्या विधीज्ञाने दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ९ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये या न्यायालयाला प्रतिवादीच्या विरुद्ध ताकीद देण्याचा अधिकार नाही, असा युक्तीवाद केलेला आहे. परंतू, वादी हा या न्यायालयाकडे कलम १४३ वरील आदेशाच्या विरुद्ध अपील घेऊन आलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या विधीज्ञांना दावा मुदतीत नाही, असे म्हणण्याचा अधिकार

नाही. वादीने व प्रतिवादीने तहसीलदार यांच्या आदेशाच्या विरुद्ध अपील केलेले नसून प्रतिवादी हा सदरच्या आदेशानंतर वादीस हरकत अडथळा करीत असल्याने प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरच्या दाव्यास बाधा येणार नाही अथवा सदरच्या मुद्दयांवर चौकशीअंती निष्कर्ष काढणे योग्य राहील.

प्रतिवादीच्या विधीज्ञाने त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्ट्यार्थ खालील न्यायनिवाड्याचा आधार घेतलेला आहे.

1] Nago Vs. State of Maharashtra, 2015(3) Mh.L.J.

In this case, *the civil suit presented beyond the prescribed period of limitation, and application under Section 5 of Limitation Act was filed for condonation of delay. The Hon'ble Bombay High Court held that, the Section 143(4) any person who is aggrieved by a decision of Tahsildar under this Section may, within a period of one year from the date of such decision, institute a civil suit to have it set aside or modified. It is settled law that Court gets its jurisdiction to entertain and decide the proceeding before it, only after the delay is condoned.*

2] Dnyandev Jadhav Vs. State of Maharashtra, Bombay High Court decided on 9th March, 2016.

In this case, *the Hon'ble High Court held that, the order passed by civil Court would be binding on parties and no relief could be granted to the petitioner in revision.*

१३] वादीने प्रस्तुतचा दावा हा तहसीलदार यांनी केलेल्या आदेशाविरुद्ध दाखल केलेला नसून तहसीलदार यांनी आदेश करुन देखील त्या आदेशाप्रमाणे प्रतिवादी हे वादीला वाद मिळकतीत नमूद केलेल्या रस्त्याने वादीच्या शेताची वहिवाट करण्यास हरकत अडथळा करीत असल्याने दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या विधीज्ञाने दाखल केलेल्या

न्यायनिवाड्यामधील तत्वांचा प्रतिवादीला आधार घेता येणार नाही. सदरच्या न्यायनिवाड्यातील तत्वे या केसला लागु होणार नाही. त्यामुळे वादीच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादीचे कधीही भरुन होणारे नुकसान होईल. वादीला त्याच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास त्याची जमीन वहिवाटता येणार नाही. प्रथमदर्शनी केस, दाव्याचा समतोल हा वादीच्या बाजूने जाणवतो. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर हे होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ४ बाबत :–

१४] वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व न्यायालयासमोर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर मी मुद्दा क्र.१ ते ३ चे चर्चेअंती मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) वादीचा निशाणी क्र. २१ वरील तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मौजा वडेगाव, ता. रामटेक, जि. नागपूर येथील शेत सर्वे नं. १४२/१ ही जमीन वहिवाटण्यास वादीस शेत सर्वे नं. १४२/२ व शेत सर्वे नं. १४३ या धु–यावरुन जाण्यास अथवा शेत वहिवाटीस लागणारी अवजारे नेण्यास प्रतिवादीने स्वतः अथवा इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातूर्त ताकीद प्रतिवादी यांच्याविरुद्ध देण्यात येते.

HARIDAS SANDIPAN SATPUTE

R.C.S. No. 43-2022
Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Location: Ramtek
Date: 2023.08.10 14:57:48 +0530

रामटेक. (एच.एस.सातपुते)

दिनांक : १०/०८/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक.